# कहाणी दोन भावंची

भावानुवाद – प्रा.सुहासिनी देशपांडे





"... रॉयननं मग हलकेच मेलेल्या कोब्राचं
छिन्नविच्छिन्न शरीर वल्ह्याच्या टोकावर उचललं आणि
विजयी वीराच्या दिमाखात चारही दिशांना मिरवून
दूर किनाऱ्याच्या झाडीत भिरकावून दिलं!
अवाक् झालेल्या सर्व प्रेक्षकांच्या मुखातून एकच हर्षोत्फुल्ल जल्लोष सुरू झाला.
"रॉयन ! रॉयन !...." दूरवरच्या एका बोटीतून सॅली मूकपणे
आपल्या थोरल्या भावाकडे कौतुकाने बघत होता."

.....'वेटिंग फॉर मिरॅकल्स' या वॉल्ट डिस्नेच्या चित्रपटाचा
प्रा. सुहासिनी देशपांडे यांनी केलेला हा स्वैर भावानुवाद. लहानपणापासून
परिस्थितीमुळे दूर राहिलेली ही दोन भावंडं शिबिरात घडणाऱ्या
वेगवेगळ्या प्रसंगांतून एकमेकांच्या जवळ येतात.
त्यांच्यातलं हळूहळू फुलणारं नातं अनुभवूया
'कहाणी दोन भावांची' या पुस्तकातून.

कथा/ किंमत ₹ ५०
छात्र प्रबोधन प्रकाशन, पुणे
jpprakashane.org या संकेतस्थळावर उपलब्ध

# कहाणी दोन भावांची

(वॉल्ट डिस्नेच्या 'वेटिंग फॉर मिरॅकल्स' या चित्रपटाचा स्वैर भावानुवाद)

**भावानुवाद**
**सुहासिनी देशपांडे**

**छात्र प्रबोधन**
**ज्ञान प्रबोधिनी**
**५१०, सदाशिव पेठ, पुणे – ४११ ०३०.**

('छात्र प्रबोधन'या कुमारांच्या मासिकाच्या सौर कार्तिक, मार्गशीर्ष व पौष शके १९२३ (नोव्हें २००२ ते जाने. २००३) या अंकांमध्ये क्रमश: प्रकाशित झालेल्या कथेचे पुनर्मुद्रण

**प्रकाशक–मुद्रक :** श्री. महेन्द्र सेठिया, संपादक, छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे–३०.

**संगणक–**अक्षरजुळणी : छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे.

**मुखपृष्ठ, चित्रे व आतील सजावट :** श्री. गिरीश सहस्रबुद्धे

**स्वामित्व :** ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे – ४११ ०३०.

**भावानुवादक :** सुहासिनी देशपांडे,
३ पुण्यश्री अपार्टमेंट, रस्ता क्र. ७,
डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे ४११०३८

**प्रथमावृत्ती :** सौर पौष शके १९२४, जानेवारी २००३

**द्वितीयावृत्ती :** सौर पौष शके १९२९, जानेवारी २००८

**पुनर्मुद्रण १ :** सौर कार्तिक शके १९३९, नोव्हेंबर २०१७

**पुनर्मुद्रण २ :** सौर माघ शके १९४५, फेब्रुवारी २०२४

**किंमत :** ₹ ५०

Kahani Doan Bhawanchi
(Free rendering of Walt Disney's movie 'Waiting for Miracles')

# लेखिकेचे मनोगत

'वेटिंग फॉर मिरॅकल्स' हा वॉल्ट डिस्नेचा गोड चित्रपट. दोन भावांमधील भावबंधाची ही कहाणी. शिकागोमधील शॉम्बर्ग या उपनगरातील भव्य नगर वाचनालयात, मोहनगरीत फिरणाऱ्या ॲलिससारखी पुस्तकांचे नि व्हिडियो कॅसेट्सचे खजिने धुंडाळत असताना ही व्हिडियो कॅसेट हाती लागली.

या चित्रपटाची कहाणी आपल्या मित्रांना सांगितलीच पाहिजे, हा चित्रपट पाहिल्या पाहिल्या मनात आलेला पहिला विचार! चित्रपट बराच जुना म्हणजे १९४५-५० च्या दरम्यानचा असला पाहिजे.

'मी कोणालाच आवडत नाही. मी कोणालाच नकोय' असं आपल्या रुसक्या, दबक्या आवाजात म्हणणाऱ्या सॅलिव्हॅननं माझ्या डोळ्यांत पाणी आणलं. त्याला जवळ घेत म्हणावंसं वाटलं. 'सॅली, अरे तू मला खूप आवडलास. आमच्या छोट्या-मोठ्या वाचकमित्रांनाही तू नक्कीच खूप आवडशील. तू, तुझा रॉयनदादा नि तुझा तो त्रासदायक बंडखोर मित्र रॅटफेसदेखील, बरं का!'

...आणि मित्र-मैत्रिणींनो, तुम्ही सगळेच सॅलीच्या नि रॉयनच्या प्रेमात पडलात. छात्र प्रबोधनकडे नि प्रत्यक्ष माझ्याकडेही तुमच्या आलेल्या पत्रांमधून, प्रतिक्रियांमधून तुम्ही ते प्रेम व्यक्त केलंत. खूप बरं वाटलं. म्हणून तर तुमच्या महेन्द्रभाईंनी मनावर घेतलं नि 'कहाणी दोन भावांची' पुस्तकरूपानं तुमच्या भेटीला येऊ शकली.

तेव्हा या पुस्तकाचं श्रेय तुम्हालाच! (बघितलंस सॅली, केवढे मित्र आहेत तुझे ते?)

दुसरं मला आवडलं ते मुलांचं शिबिर असलेली या चित्रकथेची पार्श्वभूमी! हे तर आपल्या ज्ञान प्रबोधिनीतल्या वातावरणाला अगदी जवळचं! प्रबोधिनीतल्या शिबिरातही रॉयनसारखे अनेक कल्पक, धडाडीचे नि नेतृत्वगुण असणारे अनेक युवकनेते असतात. चित्रपट पाहताना मला साहजिकच त्यांची आठवण येत होती.

तिसरं म्हणजे अमेरिकेची मग्रूर श्रीमंती, तिथली मोडकळीला आलेली कुटुंबव्यवस्था आणि कौटुंबिक मूल्यं यांविषयी काही गैरसमज असतातच आपले. या कथेत मात्र आपल्याकडच्या सारखंच गरीब कुटुंब, त्यांना भेडसावणारे गरिबीतले प्रश्न, प्रतिकूल परिस्थितीतही महत्त्वाकांक्षी स्वप्न बघणारा रॉयनसारखा युवक, एकमेकांना धरून राहाणारी कुटुंबातली मुलं हे सगळं मला खूप भावलं. गरिबीतही कौटुंबिक जिव्हाळा जपणाऱ्या घराशी आपलेही नकळत भावबंध जुळतात ते त्यामुळे.

कथा सांगताना आवश्यक ते स्वातंत्र्य घेतलंय, अर्थात् डिस्नेसाहेबांची क्षमा मागून.

छात्र प्रबोधनच्या संपादकांनी – महेन्द्रभाईंनी तसंच शैलजाताई देशमुख, वर्षा कुलकर्णी यांनी मनावर घेतलं म्हणून ही कथा पुस्तकरूपात (आणि अर्थातच छात्र प्रबोधनच्या दर्जानुसार देखण्या आणि नीटनेटक्या रूपात) तुमच्यापर्यंत येते आहे. ते सर्वच माझे सहकारी स्नेही आहेत. त्यामुळे आभार मानून त्या नात्यात औपचारिकता आणू इच्छित नाही. चित्रकार गिरीश सहस्रबुद्धे यांनी आपल्या चित्रांनी आणि मुखपृष्ठाने या कथेला सचेतन केलं आहे. त्यांना मन:पूर्वक धन्यवाद!

या चित्रपटाच्या गोष्टीच्या कथनाला काय म्हणाल? – रूपांतर, भाषांतर, स्वैर अनुवाद!– शैलजाताईंनी सुचवलेला शब्द अगदी अचूक आहे – भावानुवाद!

तेव्हा 'वेटिंग फॉर मिरॅकल्स'चा हा भावानुवाद तुमच्या हाती देताना खूप आनंद वाटतो आहे– आणखी काय म्हणू?

**सुहासिनी देशपांडे**
३, पुण्यश्री अपार्टमेंट, डहाणूकर कॉलनी,
कोथरूड, पुणे– ४११०३८

## दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने ...

दोन भावांच्या नात्याची गुंफण उलगडत जाणारा एक हृद्य प्रवास 'कहाणी दोन भावांची' या पुस्तकात लेखिकेने मोठ्या ताकदीने भावानुवादित केला आहे. त्याला तितक्याच तरल आणि भावपूर्ण चित्रांनी श्री. गिरीश सहस्रबुद्धे यांनी जिवंत केलंय. भारावून टाकणाऱ्या या कांदबरीकेच्या पहिल्या आवृत्तीचं वाचकांनी मनापासून स्वागत केलं. अनेक संस्था–शाळांनी बक्षिसांसाठी या पुस्तकाचा उपयोग केला. अखिल भारतीय बालकुमार साहित्य संमेलन संस्थेने **२००३ सालचा'उत्कृष्ट कुमार कादंबरिका'** म्हणून 'इंदिरा जोशी **पुरस्कार**' देऊन या पुस्तकाला सन्मानित केलं आहे. जिल्हापरिषदेच्या स्व–पुस्तक योजनेमध्ये या पुस्तकाची निवड झालेली आहे. या सगळ्याबद्दल झालेला आनंद दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने व्यक्त करतो.

कुमारांच्या भावविश्वाच्या समृद्धीसाठी या पुस्तकाचे योगदान निश्चितच महत्त्वपूर्ण असेल. काही प्रसंगांची भर घालून केलेल्या या दुसऱ्या आवृत्तीचेही आपण सर्व उत्स्फूर्तपणे स्वागत कराल, असा विश्वास वाटतो.

**– प्रकाशक**